<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ रघुनाथ सावे यांचा उर्वरीत शपथेवर उलटतपास आरोपी क्र. २ तर्फे विधिज्ञ श्री. डी.व्ही. माणगांवकर यांचेमार्फत</u>

**११.** माझ्या मोबाईलमधील प्रिंट कोणत्या पोलीसांनी घेतले होते त्यांचे नाव मला सांगता येणार नाही. त्या किती प्रिंट होत्या त्याबाबत पोलीसांनी माझे स्टेटमेंट घेतले होते किंवा नाही हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तूत प्रकरणातील घटना घडेपर्यंत माझे बँकेचे व्यवहार, म्यूचल फंड, शेअर्स, इ. चे व्यवहार मी स्वत: मॅनेज करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, बँक मॅनेजर यांनी माझ्या सुचनेनूसार माझ्या घरी येऊन माझे व्यवहार पूर्ण केले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यादिवशी मी व बँक मॅनेजर असे दोघेच घरी होतो. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे व्यवहार हे माझ्या मर्जीने झाले. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८/११/२०२५ व २६/११/२०२५ रोजी तथाकथीत व्यवहार झाल्यानंतर देखील माझे बाहेरील व्यवहार, बाहेर जाणे–येणे सुरु होते. हे म्हणणे खरे नाही की, वरील व्यवहार झाले त्यावेळी मी माझे नातेवाईक, मुली यांच्यासोबत संपर्कात होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी न्यायालयासमोर आरोपींची नावे सांगितलेली आहेत ती मला पोलीसांकडून कळालेली आहेत.

**१२.** पोलीसांनी मला आलेल्या फोनवरील इसमाच्या आवाजाची पडताळणी अगर विचारणा केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अज्ञात इसमा बरोबर केलेला व्यवहार हा मी स्वत:च्या मर्जीने केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी केलेल्या बँक व्यवहाराची आरोपींना कोणतीही माहिती नाही व त्या व्यवहारांशी आरोपींचा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ समशेर खान याने प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षरित्या माझी कोणतीही फसवणूक केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने बँकेतील कोणत्याही रक्कमेचा अपहार केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नातेवाईकांच्या सल्ल्यानूसार

प्रस्तूतची खोटी तक्रार दाखल केलेली आहे.

आरोपी क्र. २ तर्फे उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

<u>उलटतपास आरोपी क्र. १ तर्फे विधिज्ञ श्रीमती आर. डी. लोखंडे यांचेमार्फत</u>

**१३.** माझी मुलगी माझ्या घरापासून १ कि.मी. अंतरावर राहते. माझ्या पत्नीच्या निधनानंतर मी घरी एकटाच राहतो. माझी मुलगी माझ्याकडे माझ्या उपचारासाठी, माझी काळजी घेण्यासाठी जावून येऊन असत असे. मी हिंदुस्थान सिबा या कंपनीतून इकोलॉजीकल ऑपरेटर म्हणून निवृत्त झालो. मी दिनांक १५/१२/१९७९ मध्ये नोकरीत रुजू झालो. माझ्या नोकरीत त्यानंतर मला वेळोवेळी बढती मिळत गेली. माझे शिक्षण बी.एस्सी.एल.एल.बी. असे झालेले आहे.

**१४.** माझ्याकडे तीन फिक्स डीपॉझीट होते. तसेच अंदाजे ५० कंपनींचे शेअर्स आहेत. मला नोकरीत असल्यापासून बचत करण्याची सवय आहे. माझ्या पत्नीच्या नावे देखील म्यूचल फंडस् होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलांच्या हिताकरीता अनेक ठेवी, म्युचल फंडस्, शेअर्स यामध्ये गुंतवणूक केली होती. मी प्रामाणिकपणे नोकरी केली व निवृत्त झालो. मी कधीही पैसे दुप्पट करण्याचे आमिश दाखवणाऱ्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक केलेली नाही.

**१५.** मला गोवा पोलीस अगर महाराष्ट्र पोलीस यांच्याकडून आजतागायत कधीही तक्रारीवजा फोन आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही पोलीसांनी माझी आरोपी म्हणून कोणत्याही गुन्ह्यात आजतागायत चौकशी केलेली नाही. अज्ञात इसमांकडून दाखविण्यात आलेल्या तक्रारीची चौकशी अगर शहानिशा मी कोणत्याही पोलीस ठाण्यामार्फत केलेली नाही. दिनांक १८/११/२०२५ ते २६/११/२०२५ या कालावधीत माझे दैनंदिन काम सुरळीतपणे चालू होते.

प्रश्न : दिनांक १८/११/२०२५ ते २६/११/२०२५ या कालावधीत तुम्हाला फिर्याद दुसऱ्या कोणाकडून अगर स्वत: वाचून घ्यावी असे वाटले नाही का?

उत्तर : मला त्या लोकांनी तक्रार वाचण्यासाठी वेळ दिला नाही. तसेच मला दाखविण्यात आलेली तक्रार ही अत्यंत लहान अक्षरात असल्यामुळे ती मला वाचता आली नाही.

**१६.** हे म्हणणे खरे नाही की, कमी वेळात पैसे दुप्पट करुन देणाऱ्या कंपनीमध्ये पैसे गुंतवल्यामुळे, पोलीसांकडून चौकशी म्हणून मी ही बाब कोणालाही सांगितली नाही. जी तथाकथीत व्यक्ती माझ्याशी फोनवरुन बोलत होती तिला मी पाहिलेले नाही. साक्षीदार सांगतो की, त्यांनी आपला चेहरा दाखवलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या तथाकथीत व्यक्तीस तिचा चेहरा दाखविण्यासाठी मी आग्रह केला नाही.

प्रश्न : इतकी मोठी रक्कम अज्ञात व्यक्तीला देण्यापूर्वी तुम्हाला विचार करावासा वाटला नाही का ?

उत्तर : अज्ञात व्यक्तीने मला धमकी दिली असल्याने मला पर्याय नव्हता.

**१७.** हे म्हणणे खरे नाही की, पैसे दुप्पट करुन देणाऱ्या कंपन्यांमध्ये पैसे गुंतविण्याचा मला नाद होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझे बिंग फुटू नये म्हणून कोणाचीही कायदेशीर मदत घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या अज्ञात व्यक्तीस मी जामीनासाठी वकीलाची मदत घेतो असे कळविले नाही. मला जामीनासाठी वकील लागतो याची माहिती आहे. मला व्हीडीओ कॉलवरुन सर्वोच्च न्यायालयाचा व्हिडीओ दाखविण्यात आला होता, त्याची शहानिशा मी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, अज्ञात व्यक्तीने मला सर्वोच्च न्यायालयाचा व्हीडीओ दाखवला ही बाब माझ्या फिर्यादीत नमूद नाही. ती फिर्यादीत का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मला माझ्या पगारा व्यतिरिक्त दुसरा कोणताही आर्थिक स्त्रोत नव्हता. मला फोन करणाऱ्या व्यक्तीने त्याचे नाव अजय शर्मा असल्याचे सांगितले होते ती बाब मी पोलीसांना सांगितली होती किंवा कसे

हे मला आठवत नाही. पोलीसांनी माझ्या मोबाईलमधून डेटा घेऊन त्याची प्रिंट काढली. तो डेटा काय होता हे मला माहित नाही.

**१८.** बँक मॅनेजर जेव्हा घरी आले तेव्हा मी घरी एकटाच होतो. ज्या अकाऊंटवर मी पैसे पाठवले त्या अकाऊंट होल्डरचं नाव मी बँक मॅनेजरला विचारले नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, अज्ञात इसमाने सांगितलेल्या बँक अकाऊंटवर पैसे पाठवले. मी मोबाईल संदर्भात दिलेल्या प्रमाणपत्रात (पी.१०) काय लिहिले आहे ते मला आठवत नाही.

**१९.** अज्ञात इसमाने मी पैसे पाठवल्यानंतर मला दोन पावत्या पाठवल्या होत्या ही बाब मी पोलीसांना सांगितली नव्हती. माझ्या न्यायालयासमोरील जबाबातील परिच्छेद क्र. ४ मधील 'मागणी रक्कम १ कोटी, अगर ३० लाख अगर १५ लाख' याबाबतचा मजकूर मी पोलीसांना सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी केवळ पोलीसांच्या सांगण्यावरुन आरोपी क्र. १ चे नाव सांगितलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, शेअर्स, एफ.डी. लिक्विडेट केल्यासंदर्भात मी पोलीसांना कोणतेही कागदपत्र दिले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मोबाईलच्या मालकीसंदर्भात कोणताही कागदपत्र मी पोलीसांना दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ चा या घटनेशी कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र. १ विरुध्द खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे.

आरोपी क्र. १ तर्फे उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

(श्रीमती स्वाती जं. पाटील)

दिनांकः ३०/०६/२०२६. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,

सिंधुदुर्ग – ओरोस.